# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**प्रेसनोट** दिनांक २५/०१/२०२३

**“ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक विभागाने स्पा सेंटरच्या नावाखाली स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्यांवर कारवाई करून ४ पिडीत महिलांची केली सुटका”**

मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक २३/०१/२०२३ रोजी सांगवी पोलीस स्टेशन हद्दीत स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी अवैधरित्या स्पा सेंटरच्या नावाखाली मुलींकडुन वेश्याव्यवसाय करुन घेणा-यांवर कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक २३/०१/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधब कक्षातील पोलीस अधिकारी व अमंलदार यांना सांगवी पोलीस स्टेशन हद्दीत शॉप नं- ७ व ८ पहिला मजला, गणेश इ बिल्डींग,पिंपळे सौदागर पुणे येथील Neung Thai नावाचे Spa सेंटरमध्ये स्वतःचे आर्थिक फायदयासाठी मुलींकडुन पैश्याचे आमिष दाखवुन वेश्या व्यवसाय करवुन घेतला जात आहे अशी मिळालेल्या माहितीवरुन बनावट ग्राहक पाचारण करुन पडताळणी करुन सदर ठिकाणी सापळा रचुन मॅनेजर आरोपी याच्या ताब्यातुन एकुण ०४ पिडीत महाराष्ट्रीयन मुलींची वेश्याव्यवसायातुन सुखरुप सुटका करण्यात आलेली असुन घटनास्थळावरुन व आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

१) ४५००/- रोख रक्कम
२) ६०/- रु.किं.चे इतर साहित्य.
३) ३०,०००/-रु.किं.चे ०३ मोबाईल फोन जु.वा.किं.अं.
-----------------

**असा एकुण ३४,५६० रु किमतीचा मुद्देमाल** जप्त करुन आरोपी नामे १) ओमकार विनायक जोशी ऊर्फ सत्यम गौडा वय २४ वर्षे रा.घर नं. १० म्हात्रे ब्रिजजवळ, अजिंठा बिल्डींग, पहिला मजला, दत्तवाडी पुणे. मुळ पत्ता.रुम नं ४ कॉलर बिल्डींग, राणीबाग, हडपसर पुणे मो.नं ८३९०४७७१०२ (स्पा मॅनेजर) **पाहिजे आरोपी नामे २) नंदराम वैभव गोविंद** वय ३१ वर्षे रा सर्वे नं ७८/७९, शिवपार्क, फेज- २ मांजरी बु.पुणे मोबा.७०५७५२७६४५ (स्पा चालक मालक) यांचे विरुध्द सांगवी पोलीस स्टेशन येथे गुरनं ४०/२०२३ **भा.द.वि.कलम ३७०(३), ३४ सह अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५,७ अन्वये** गुन्हा नोंद करुन पुढील तपास सांगवी पोलीस स्टेशन करत असुन एक आरोपी यास अटक करण्यात आली असुन त्यास दिनांक २७/०१/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी मिळालेली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे सो, मा.सह पोलीस आयुक्त श्री. मनोज लोहिया सो, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ संजय शिंदे सो, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), स्वप्ना गोरे मॅडम सो. सो, मा.सहा.पोलीस आयुक्त(गुन्हे), डॉ.प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षातील पोलीस निरीक्षक श्री.देवेंद्र चव्हाण, पोउपनि धैर्यशिल सोळंके, विजय कांबळे, पोलीस अमंलदार, सुधा टोके, भगवंता मुठे, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, वैष्णवी गावडे, सोनाली माने यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड